24 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# शिवाजी विद्यापीठात अवतरले छत्रपती शिव-शाहू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीनदिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला रविवारी सकाळी शोभायात्रेने मोठ्या जल्लोषी वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग दर्शविला. यानिमित्ताने राजमाता जिजाऊसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह लता मंगेशकर, आशा भोसले, पंडित भीमसेन जोशी, तबलानवाज झाकीर हुसेन, बालगंधर्व, चित्रमहर्षी बाबूराव पेंटर, फाल्गुनी पाठक, राधाकृष्ण, वासुदेव, मीरा अशा व्यक्तिरेखाही पारंपरिक वेशभूषेद्वारे विद्यापीठात अवतरल्या. विद्यार्थी विकास विभागाचे माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. मुख्य इमारतीपासून हलगी व ढोलताशांच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. विविध अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण केले.



शिवाजी विद्यापीठात रविवारी शिवस्पंदन महोत्सवावेळी अशा व्यक्तिरेखा पारंपरिक वेशभूषेद्वारे विद्यापीठात अवतरल्या.

यामध्ये 'संविधान एक है; सब के लिए सेफ है', ग्रामीण व कृषिसंस्कृतीचे दर्शन, चित्रपटाचे चित्रीकरण, बालमजुरी निर्मूलन, अशा अनेक विषयांवरील सादरीकरण करण्यात आले. शिवस्पंदन महोत्सवाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत औपचारिक उद्घाटन करण्यात आले. दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा पार पडल्या.

27 FEB 2016

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शोभायात्रेने 'शिवस्पंदन'ला जल्लोषात प्रारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळातर्फे आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला रविवारी सकाळी शोभायात्रेने जल्लोषी वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. शोभायात्रेनिमित्त राजमाता जिजाऊसाहेब, शिवाजी महाराज, शाहू महाराज, लता मंगेशकर, आशा भोसले, पंडित भीमसेन जोशी, तबलानवाज झाकीर हुसैन, बालगंधर्व, चित्रमहर्षी बाबूराव पेंटर, फाल्गुनी पाठक, राधा-कृष्ण, वासुदेव, मीरा अशा



व्यक्तिरेखाही पारंपरिक वेशभूषेद्वारे विद्यापीठात अवतरल्या.

विद्यापीठाच्या प्रांगणातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन झाले. मुख्य इमारतीपासून पुतळ्यास प्रदक्षिणा घालून प्राणीशास्त्र अधिविभागातील कार्यक्रम स्थळापर्यंत हलगी व ढोल-ताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. मुख्य इमारतीसमोर सहभागी संघांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने सादरीकरणही केले.

राजस्थानी, बंगाली, जराती, पंजाबी वेशभूषेतील विद्यार्थिनींनी त्या त्या राज्यांतील पारंपरिक नृत्ये सादर केली. जोतिबाची सासनकाठीही नाचवण्यात आली. विविध गायक कलाकारांच्या वेशभूषेतील कलाकारांनी त्यांच्या गायन कलेचेही दर्शन घडवले. राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला'मधील तळीरामही शोभायात्रेत अवतरला.

महोत्सवाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शाहीर विशारद आझाद नायकवडी, मनीषा नायकवडी, डॉ. मदनलाल शर्मा, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. एस. आर. यन्कंची, डॉ. के. डी. कुचे, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. एस. एम. भोसले, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. एस. टी. कोंबडे, डॉ. सुमेधा साळुंखे, संग्राम भालकर, दीपक बिडकर, विजय टिपुगडे, बबन माने, सुरेखा अडके आदींसह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दर शंभर मैलांवर संस्कृती बदलते; पण मानवी जीवनमूल्ये कायम राहतात. ही मूल्ये टिकवून ठेवण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे, असे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले.

## विद्यार्थ्यांनी संवादसंपन्न व्हावे : कुलगुरू

शोभायात्रेनंतर प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या विकासाबरोबरच संवाद कौशल्याच्या वृद्धीकडेही जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

24 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'शिवस्पंदन'ला शोभायात्रेने जल्लोषी प्रारंभ

## राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला शोभायात्रेने प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग दर्शविला आहे. राजमाता जिजाऊ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह लता मंगेशकर, आशा भोसले, पंडित भीमसेन जोशी, तबलानवाज झाकीर हुसैन, बालगंधर्व, चित्रमहर्षी बाबूराव पेंटर, फाल्गुनी पाठक, राधाकृष्ण, वासुदेव, मीरां अशा व्यक्तीरेखाही पारंपरिक वेशभूषेद्वारे विद्यापीठात अवतरल्या.

विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. विद्यार्थी विकास विभागाचे माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. हलगी व ढोलताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. मुख्य इमारतीसमोर सहभागी संघांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने सादरीकरण केले.

विविध अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. यामध्ये 'संविधान एक है; सब के लिए सेफ है', ग्रामीण व कृषीसंस्कृतीचे दर्शन, चित्रपटाचे चित्रीकरण, बालमजुरी निर्मूलन, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि कर्करोग, योग-प्राणायामाचे महत्त्व, सामाजिक सलोखा, स्त्री भ्रूण हत्या निर्मूलन अशा अनेक विषयांवरील सादरीकरण केले. जोतिबाची सासनकाठीही नाचवण्यात आली. विविध गायक कलाकारांच्या वेशभूषेतील कलाकारांनी त्यांच्या गायन कलेचेही दर्शन घडविले. राम गणेश गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' मधील तळीरामही शोभायात्रेत अवतरला. प्राणिशास्त्र अधिविभागातील सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले.

विद्यार्थ्यांनी कलागुणांच्या विकासाबरोबरच संवादकौशल्याच्या वृद्धीकडेही जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, असा संदेश कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्र- कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, दर शंभर मैलांवर संस्कृती बदलते, पण मानवी जीवनमूल्ये मात्र कायम राहतात. ही मूल्ये टिकवून ठेवण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे. विज्ञान आणि संस्कृती यांच्या मिलाफातून ही जीवनमूल्ये वृद्धिंगत करण्याविषयी कुतूहल असणे गरजेचे आहे. डॉ. नितीन कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. मदनलाल शर्मा, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. एस. आर. यन्कंची, डॉ. के. डी. कुचे, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, शाहीरविशारद आझाद नायकवडी, आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन महोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह विविध वेशभूषा केलेले विद्यार्थी.

### सर्वच स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

प्राणीशास्त्र सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा पार पडल्या. त्याचप्रमाणे रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात पार पडल्या. या सर्वच स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2025
पुढारी

# विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये रविवारी सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.तानाजी चौगुले, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ.शरद बनसोडे, डॉ. किशोर कुचे, डॉ. प्रल्हाद माने, विद्युत अभियंता अमित कांबळे, एमबीए अधिविभागाच्या प्रभारी संचालक डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजश्री घोडके, डॉ. परशराम देवळी, जयश्री लोखंडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 FEB 2025

तरुण भारत

# संत गाडगे बाबा महाराज यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. किशोर कुचे, डॉ. प्रल्हाद माने, विद्युत अभियंता अमित कांबळे, एमबीए अधिविभागाच्या प्रभारी संचालक डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजश्री घोडके, डॉ. परशराम देवळी, जयश्री लोखंडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2025
तरुण भारत

# जिथे समस्या, अडचणी तिथे नाविन्यता : डॉ. डेळेकर

प्रतिनिधी
चंदगड

नवकल्पना आणि स्टार्टअपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरच्या वाटा निवडाव्यात. व्यवसायामध्ये आलेल्या डिजिटल तंत्रज्ञानाची माहिती घेऊन नवसंकल्पनेच्या आधारावर व कौशल्याच्या आधारावर विद्यार्थ्यांनी आपला विकास घडवावा, असे मत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. सागर डेळेकर यांनी व्यक्त केले.

हलकर्णी येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयांतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इनोवेशन आणि लिंकेजेस विभागामार्फत आयोजित उद्योजकांना सबलीकरण करणे, नवसंकल्पना आणि स्टार्टअप उत्कृष्टता या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. बी. डी. अजळकर होते.

प्रास्ताविक डॉ. राजेश घोरपडे यांनी केले. स्वागत प्रा. विजय घोडके यांनी केले. उद्घाटन दौलत विश्वस्त संस्थेचे उपाध्यक्ष संजय पाटील यांनी केले. यावेळी डॉ. डेळेकर यांनी उद्योजकतेमध्ये नाविन्यता, तंत्रज्ञान, गुंतवणुकीची संधी, सरकारी धोरणे, निधी अशा अनेक गोष्टींची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठाचे रुसा समन्वयक प्रा. गोविंद कोळेकर यांनी नॅकमध्ये होऊ घातलेल्या सुधारणांबाबत विवेचन केले. सूत्रसंचालन कोमल होणगेकर यांनी केले तर आभार प्रा. ए. एस. बागवान यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष

24 FEB 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो मटेरियल्स विज्ञान-तंत्रज्ञानातील क्रांतिकारी पाऊल

## डॉ. के. वाय. राजपुरे यांचे प्रतिपादन : राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे नॅनो मटेरीयल्स वेगवेगळया उद्योगामध्ये क्रांती घडवत आहे. आरोग्यसेवा, इलेक्ट्रॉनिक्स, ऊर्जा आणि पर्यावरण यासारख्या क्षेत्रामध्ये नॅनो मटेरीयल्सच्या नवीन संशोधनामुळे अधिक कार्यक्षम, टिकाऊ आणि किफायतशीर उपाय शोधले जात आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे डॉ. के. वाय. राजपुरे यांनी केले.

न्यू कॉलेजच्या पदार्थविज्ञान विभागामार्फत आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते




**कोल्हापूर : न्यू कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. के. वाय. राजपुरे. सोबत डॉ. पी. डी. कांबळे, डॉ. के. जी. पाटील, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. पी. बी. पाटील आदी.**

बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के.जी.पाटील होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ. मुर्तझा बोहरा (महिंद्रा युनिव्हर्सिटी, हैदराबाद) डॉ. विकास पाटील (अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर), डॉ. पद्मनाभ राय, डॉ. विजय हिरवारकर,जर्मन येथील प्रॉडक्ट इंजिनियर डॉ. अपूर्व शर्महि यांनी मार्गदर्शन केलें.

पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रशांत पाटील यांनी करून दिला. डॉ. पी. डी. कांबळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. अनिता मगर-पोवार व कांचन पाटील यांनी केले. यावेळी पदाधिकारी व संचालक, उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले, प्रबंधक एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताह प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात दि. २४ फेब्रुवारीपासून राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात सोमवारी सकाळी कार्यक्रमाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी दिली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ अशोक गिरी यांचे दि. २४ रोजी व्याख्यान होणार आहे. २५ फेब्रुवारी रोजी रसायनशास्त्र विभागात व्हिडीओ मेकिंग स्पर्धा होईल. याच दिवशी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे विज्ञान आणि नवोपक्रमातील नेतृत्वाचे नियम या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. विजय खरे हे विज्ञान आणि नवोपक्रम तसेच प्रो-इनोव्हेशनमधील धोरणात्मक धोरण या विषयावर व्याख्यान देतील. २७ फेब्रुवारी रोजी प्रा. आर. एस. पंडित आणि प्रा मिलिंद निकाळजे यांची विविध विषयांवर व्याख्याने होतील.

24 FEB 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी कलागुणांबरोबरच संवादसंपन्न व्हावे

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी कलागुणांबरोबरच संवाद संपन्न व्हावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला रविवारी सकाळी प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला.

विद्यार्थी विकास विभागाचे माजी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते शोभायात्रेचे उद्घाटन झाले. मुख्य इमारतीपासून पुतळ्यास प्रदक्षिणा घालून प्राणीशास्त्र अधिविभागातील कार्यक्रम स्थळापर्यंत हलगी व ढोल-ताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली.

शोभायात्रेच्या निमित्ताने राजमाता जिजाऊसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्यासह लता मंगेशकर, आशा भोसले, पंडित भीमसेन जोशी, तबलानवाज झाकीर हुसैन, बालगंधर्व, चित्रमहर्षी बाबूराव पेंटर, फाल्गुनी पाठक, राधाकृष्ण, वासुदेव, मीरा अशा व्यक्तिरेखाही पारंपरिक वेशभूषेद्वारे विद्यापीठात अवतरल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात फुगडीसह पारंपरिक नृत्य सादर करताना विद्यार्थिनी. (छाया : नाज ट्रेनर)

### महोत्सवात आज...

महोत्सवात सोमवारी (दि. २४) सकाळी ७.३० वाजता वाद्यमहोत्सव साजरा करण्यात येईल. मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसरात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत वाद्यमहोत्सवास प्रारंभ होईल. त्याखेरीज क्रांतिवन परिसर (गेट क्र. ८ जवळ), संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव परिसर, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळ्यासमोरील उद्यान या ठिकाणी देशभरातील विविध लोकवाद्यांच्या वादनाचा रसिकांना आनंद घेता येईल. या दिवशी मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात होतील.

विविध अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. यामध्ये 'संविधान एक है; सब के लिए सेफ है', ग्रामीण व कृषी संस्कृतीचे दर्शन, चित्रपटाचे चित्रीकरण, बालमजुरी निर्मूलन, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि कर्करोग, योग-प्राणायामाचे महत्त्व, सामाजिक सलोखा, स्त्री भ्रूण हत्या निर्मूलन अशा अनेक विषयांवरील सादरीकरण शोभायात्रेदरम्यान करण्यात आले.

राजस्थानी, बंगाली, जराती, पंजाबी वेशभूषेतील विद्यार्थिनींनी त्या-त्या राज्यांतील पारंपरिक नृत्यांची झलक सादर केली. जोतिबाची सासनकाठीही नाचवण्यात आली. विविध गायक कलाकारांच्या वेशभूषेतील कलाकारांनी त्यांच्या गायन कलेचेही दर्शन घडविले. राम गणेश गडकऱ्यांच्या 'एकच प्याला'मधील तळीरामही शोभायात्रेत सहभागी झाला होता.

शोभायात्रेनंतर प्राणीशास्त्र अधिविभाग सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन झाले.

महोत्सवाचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मीना पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शरद बनसोडे, शाहीर विशारद आझाद नायकवडी, मनीषा नायकवडी आदी उपस्थित होते.

दरम्यान, उद्घाटन समारंभानंतर प्राणीशास्त्र सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा पार पडल्या. त्याचप्रमाणे रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात पार पडल्या. या सर्वच स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2025
सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताह

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताहाचे उदघाटन सोमवारी (ता. २४) प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ अशोक गिरी यांचे व्याख्यान होईल. मंगळवारी रसायनशास्त्र विभागात व्हिडिओ मेकिंग स्पर्धा होणार असून, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे 'विज्ञान आणि नवोपक्रमातील नेतृत्वाचे नियम' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. विजय खरे यांचे 'विज्ञान आणि नवोपक्रम तसेच प्रो-इनोव्हेशनमधील धोरणात्मक धोरण' या विषयावर व्याख्यान होणार आहे. गुरुवारी प्रा. आर. एस. पंडित आणि प्रा. मिलिंद निकाळजे यांची विविध विषयांवर व्याख्याने होणार असल्याची माहिती रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी दिली.